नियमित फौ. ख. क्र.१११/२०२४
सरकार -वि.- चंद्रशेखरसिंह
नि.क्र. २२.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - राजेश मधुकरराव कामथे,
वय ५४ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
राहणार – भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. फिर्यादी भारतीसिंह व आरोपी चंद्रशेखरसिंह यांना मी ओळखतो. ते सन-२०२२-२३ पासून माझ्याकडे किरायाने राहतात. ते माझ्याकडे घराच्या वरील मजल्यावर किरायाने राहतात. घटना ही दि.१२.०४.२०२४ रोजी सकाळी ९.०० वा. आरोपीच्या घरी घडली होती. त्यादिवशी पती पत्नीमध्ये काय घडले ते मला माहीत नाही. पण मला भांडणाचा आवाज त्यांच्या घरामधून आला. त्यानंतर काही वेळाने भारतीसिंह खाली ओरडत आली. त्यावेळी मी तिला विचारणा केली असता तिने आरोपी तिला मारहाण करीत असल्याचे सांगितले. तिने मला सांगितले की, माझा पती मला म्हणतो की, तु मला खाऊन पिवून चालवते व माझे पूर्ण करते काय? त्यावेळी भारतीसिंहच्या हाताला मार लागला होता. त्यानंतर मला दुसऱ्या दिवशी माहीत झाली की, भारतीसिंहच्या हाताला मार लागल्यामुळे फ्रक्चर झाले आहे. घटनेच्यापूर्वीही आरोपी व फिर्यादीमध्ये वाद झाले होते त्यावेळेही फिर्यादीने त्याच्या विरोधात तक्रार दिली होती, परंतु, ते प्रकरण आपसात मिटले होते. पोलिसांनी माझे बयान घेतले होते. मी आरोपीला ओळखतो.
सरतपास संपला.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

२. मी मेंढेगाव येथे कामाला आहे. मी कंपनीच्या जनरल शिप्टमध्ये काम करतो. मेंढेगाव भिवापूरपासून दहा कि.मी. लांब आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला

कामावर सकाळी लवकर जावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्यक्ष घटना माझ्या समक्ष घडलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीला कशामुळे मार लागला हे मला माहीत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे पती तिला मुंबईवरुन भेटण्याकरिता येत होते. हे म्हणणे खरे आहे की, मुंबईवरुन आल्यावर आरोपी हा बायको मुलांना घेऊन फिरायला जात होता व बाजाराला जात होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा फिर्यादीला घेऊन हॉटेलवर जेवायला जात होता. हे मला माहीत नाही की, आरोपी आजही मुलांना भेटण्याकरिता घरी येतो, परंतु, फिर्यादी त्याला भेटू देत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीची बहीण व आई काही दिवस फिर्यादीसोबत राहत होते कारण फिर्यादीला कामावर जाण्याकरिता मदत होऊ शकेल. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर आरोपीच्या बहिणीचे लग्न झाल्यामुळे ती तिच्या सासरी गेली व आरोपीची आई प्रकृती बरी नसल्यामुळे तिच्या गावाला गेली. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचा हात कशामुळे फ्रक्चर झाला हे मला प्रत्यक्ष माहीत नाही. साक्षीदार सांगतो मला फिर्यादीने सांगितले होते.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने आजपर्यंत माझ्यासोबत कधीही भांडण केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी कधीही दारु पिवून आढळला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व फिर्यादी माझ्या घरी किरायाने व्यवस्थित राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, किरायदार म्हणून आरोपी व फिर्यादी यांची भांडणासंदर्भात माझ्याकडे कधीही तक्रार आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेली कुठलीही घटना घडलेली नाही.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - १७.०१.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.